दै. पुण्यनगरी दि. ०९-०६-२४

# शहरातील लक्ष्मीनगर भागात ८.२७ लाखांचा गांजा पकडला

**नांदेड / प्रतिनिधी**

नांदेड जिल्ह्यात गांजा विक्री करणाऱ्यांचे प्रमाण वाढले असून शहरातील लक्ष्मीनगर परिसरात स्थानिक गुन्हे शाखेने ८ लाख २७ हजार रुपये किंमतीचा ४१.३५० किलो गांजा पकडला आहे. या प्रकरणी दोघांना जेरबंद करण्यात आले आहे. दि.८ जून रोजी स्थागुशाने ही कारवाई करण्यात आली.

शहरासह जिल्ह्यात अंमली पदार्थांची विक्री व तस्करी वाढल्याने पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी स्थागुशाचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांना कारवाई करण्याचे आदेश दिले होते. स्थागुशाचे पोलीस उपनिरीक्षक आनंद बिचेवार यांच्या नेतृत्वाखाली स्थागुशाने पथक तयार करुन आरोपींचा शोध घेत होते. दि.८ जून रोजी गोपनीय माहितीवरुन राजपत्रित अधिकारी नायब तहसीलदार एम.डब्ल्यू.दिगलवार, स्थागुशाचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, पोलीस निरीक्षक गणेश चव्हाण यांनी लक्ष्मीनगर बायपास रोडवर महेबुबनगर भागात छापा टाकून दोघांना जेरबंद केले.



या प्रकरणी अहेमदखान अनवर खान (२८, रा. रहीमनगर देगलुर नाका नांदेड) व शेख अकत्तरी बेगम शेख मिया (५५, रा. महेबुबनगर जवळ लक्ष्मीनगर बायपास रोड नांदेड ता.जि. नांदेड) यांना पकडुन त्यांच्या घरातुन ८ लाख २७ हजार रुपये किंमतीचे ४१.३५० किलो गांजा जप्त करण्यात आला. अधिक चौकशी केली असता आरोपीची आई व नणंद जोहराबी ऊर्फ बच्याखाला अन्नवर खान पठाण (रा. टायरबोर्ड नांदेड) हिने गांजा विक्री करण्यासाठी येथे ठेवल्याचे प्रथमिक चौकशीत निष्पन्न झाले आहे. या दोन्ही आरोपींना विमानतळ पोलीस ठाण्यात हजर करुन पोलीस उपनिरीक्षक आनंद बिचेवार यांच्या तक्रारीवरुन ३ आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, अपर पोलीस अधीक्षक खंडेराव धरणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार गंगाधर कदम, संजीव जिंकलवाड, विठ्ठल शेळके, मोतीराम पवार, महेश बडगु, राजबंशी, ज्वालासिंग बावरी, मारोती मोरे, गजानन बयनवाड, महील अंमलदार सौ. पंचफुला फुलारी, सौ. हेमलता भोयर, चालक अंमलदार शंकर केंद्रे, अर्जुन शिंदे यांनी ही कारवाई पार पाडली आहे.